साप्ताहिक

''एकच ध्येय... एकच आवाज''

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक २५ वा | सोमवार, दि. ०६/०७/२०२६ ते दि. १२/०७/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

### आरोग्य सेवेत कट प्रॅक्टिस व निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही

## शासकीय रुग्णालयांवर विश्वास वाढवून संस्थात्मक प्रसूतींना प्राधान्य द्या–सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे निर्देश

मुंबई – राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार, पारदर्शक आणि तत्पर आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य यंत्रणेने अधिक जबाबदारीने काम करावे. रुग्णांना जाणीवपूर्वक खासगी रुग्णालयांकडे वळविणे, कट प्रॅक्टिसला प्रोत्साहन देणे किंवा शासकीय यंत्रणेतील उपलब्ध सुविधांकडे दुर्लक्ष करणे कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाही. अशा प्रकारांमध्ये दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकारी, ईएमएस समन्वयक आणि कर्मचाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल असे स्पष्ट निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

मंत्रालयातील समिती कक्षात आयोजित या बैठकीसाठी आमदार नरेंद्र भोंडेकर, आमदार महेंद्रशेठ दळवी, आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, उपसंचालक राजेंद्र भालेराव यांच्यासह आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, ईएमएस समन्वयक तसेच राज्यातील सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

आरोग्य मंत्री पुढे म्हणाले की, राज्यातील १०८ आणि १०२ रुग्णवाहिका सेवांचा उद्देश गरजू रुग्णांना तातडीने शासकीय रुग्णालयात किंवा महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मान्यताप्राप्त रुग्णालयात उपचारासाठी पोहोचविणे हा आहे. काही ठिकाणी रुग्णांना जाणीवपूर्वक विशिष्ट खासगी रुग्णालयांमध्ये पाठविल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या सर्व प्रकरणाचा मागील सहा महिन्यांचा रेफरल डेटा तपासण्यात यावा. ज्या ठिकाणी अनियमितता आढळेल, तेथे संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

राज्यात संस्थात्मक प्रसूतींचे प्रमाण वाढविणे हे आपले सर्वोच्च प्राधान्य आहे. यासाठी आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करावे.रुग्णाला अनावश्यकपणे खासगी रुग्णालयात पाठविले जात असल्यास त्याची जबाबदारी निश्चित करण्यात येईल. याबाबत सर्व जिल्ह्यांनी सविस्तर सर्वेक्षण करून अहवाल शासनाकडे सादर करावा.

राज्यातील प्रत्येक शासकीय आरोग्य संस्थेमध्ये दर्जेदार औषधे, स्वच्छता, आवश्यक मनुष्यबळ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध राहावी, यासाठी नियमित आणि प्रभावी देखरेख ठेवण्याचे निर्देशही मंत्री आबिटकर यांनी दिले. शासनाने आवश्यक निधी आणि सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतरही कामामध्ये दिरंगाई अथवा निष्काळजीपणा झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

'आरोग्य संवाद यात्रा'च्या माध्यमातून १५ जुन पासून राज्यभर प्रत्यक्ष पाहणी मोहीम राबविण्यात येत असून, उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये तसेच गावपातळीवरील आरोग्य समित्यांच्या कामकाजाची प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करण्यात येणार आहे. या पाहणीदरम्यान आढळणाऱ्या त्रुटींसाठी संबंधित यंत्रणेला जबाबदार धरले जाईल. महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ राज्यातील प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याने या योजनेच्या अंमलबजावणीला गती द्यावी. गाव, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालय स्तरावरील सर्व आरोग्य समित्या अद्ययावत ठेवण्याचे निर्देश देताना कालबाह्य समित्या कायम ठेवण्याचा प्रकार अजिबात सहन केला जाणार नाही असे आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. समित्यांमध्ये विद्यमान सरपंच व सदस्यांचा समावेश करून त्यांचे नियमित कामकाज सुरु ठेवणे ही संबंधित जिल्हा प्रशासनाची जबाबदारी आहे.

दर तीन महिन्यांनी आमदारांच्या उपस्थितीत होणाऱ्या जिल्हास्तरीय आरोग्य आढावा बैठकींना सिव्हिल सर्जन आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी स्वतः उपस्थित राहणे बंधनकारक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीत लोकप्रतिनिधींमार्फत स्थानिक आरोग्य सेवांच्या गरजा, समस्या आणि अपेक्षा थेट प्रशासनापर्यंत पोहोचतील. या बैठकींचे इतिवृत्त शासनाकडे सादर करण्यात येणार असून त्याआधारे पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. आरोग्य सेवेमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य देत राज्यातील प्रत्येक नागरिकाला विश्वासार्ह आणि सक्षम शासकीय आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी संपूर्ण आरोग्य यंत्रणेने संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी यावेळी केले.असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन बोडके यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

## वारीत अत्यावश्यक रुग्णांकरिता प्रथमच एअर ॲम्बुलन्सची सुविधा–आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

मुंबई – आषाढी यात्रेसाठी पालखी सोहळ्यासोबत लाखो वारकरी भाविक येत असतात. पालखी मार्गावर तसेच आषाढी यात्रा कालावधीत पंढरपूर शहरात मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या गर्दीतून वारकरी भाविकांना आरोग्य सुविधा तात्काळ मिळाव्यात यासाठी सुसज्ज रुग्णवाहिका, बाईक म्बुलन्सचा वापर करण्यात येतो. यावर्षीपासून अत्यावश्यक रुग्णांकरिता नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून एअर म्बुलन्सची सुविधा उपलब्ध करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज दिली. आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर वारकरी भाविकांना पालखी मार्ग व तळांवर देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांबाबतच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक तथा आयुक्त संजय काटकर यांच्यासह पुणे, सातारा, सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, महानगरपालिका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक आणि तालुका आरोग्य अधिकारी दृकश्राव्य माध्यमाद्वारे उपस्थित होते. यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, वारकरी वारीसाठी घरातून बाहेर पडल्यानंतर पुन्हा घरी पोहोचेपर्यंत आरोग्याच्या सर्व आवश्यक सुविधा पुरवण्याचे नियोजन आरोग्य विभागाने केले आहे. त्या नियोजनाप्रमाणे सर्व सेवा पुरवाव्यात. वारी कालावधीत भाविकांना डिजिटल आरोग्य सुविधा देण्यात येणार आहेत. 'आरोग्य संपन्न वारी' व 'वारी सहाय्य' या माध्यमातून पालखी मार्गावर वारकरी भाविकांना तात्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध होणार असून, यामध्ये प्रत्येक आरोग्य कर्मचारी व आशा सेविका यांच्यामार्फत माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

वारकरी भाविकांना आरोग्य सुविधा पुरवताना कोणतीही उणीव राहू नये. वारी कालावधीत आरोग्य सुविधा देण्यासाठी पंढरपूर येथील स्थानिक डॉक्टरांची उपलब्धता राहण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांनी स्वतंत्र बैठक घेऊन त्यांना सूचना द्याव्यात. पालखी मार्गावरील तसेच शहरातील खासगी वैद्यकीय रुग्णालयांतील दहा टक्के खाटा आरक्षित करण्यात येणार आहेत. खासगी डॉक्टरांना आरोग्य सेवा देण्याचे आवाहन आपण करतो, त्यामुळे सरकारी डॉक्टरांनीही अधिक जबाबदारीने आणि संवेदनशीलतेने सेवा द्यावी. वारकऱ्यांना सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यात सार्वजनिक आरोग्य विभाग कुठेही कमी पडता कामा नये., असे त्यांनी सांगितले.

सार्वजनिक आरोग्य विभागाने यंदाच्या आषाढी वारीत गंभीर रुग्णांसाठी एअर म्बुलन्सची सुविधा आणि 'आरोग्यसंपन्न वारी' मोबाईल प ही आरोग्य व्यवस्थेची दोन महत्त्वाची साधने उपलब्ध करून दिली आहेत. मोबाईल पच्या माध्यमातून वारकऱ्यांना पालखी मार्गावरील आरोग्य सुविधा, **(पान ३ वर)**

## शाळांच्या परिसरात अपायकारक अन्नपदार्थ व कॅफिनयुक्त पेयांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई–मंत्री नरहरी झिरवाळ

मुंबई – शाळांच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या आरोग्यास अपायकारक ठरणारे अन्नपदार्थ; तसेच कॅफिनयुक्त पेयांची विक्री आढळून आल्यास संबंधितांवर प्रचलित कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, अशी माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत दिली. स्टिंग एनर्जी ड्रिंकच्या सेवनामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांबाबत सदस्य विक्रम पाचपुते यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री झिरवाळ बोलत होते. यावेळी सदस्य राहुल कुल आणि वरुण सरदेसाई यांनीही उपप्रश्न उपस्थित केले. मंत्री झिरवाळ म्हणाले की, शाळांच्या आवारात व परिसरात बालकांच्या आरोग्यास अपायकारक अन्नपदार्थ आणि कॅफिनयुक्त पेयांची विक्री होऊ नये, यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. अशा प्रकारची विक्री आढळल्यास त्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाला देण्याबाबत पालक, शिक्षक, मुख्याध्यापक तसेच जिल्हा परिषदांना सूचित करण्यात आले असून संबंधितांवर कायद्यानुसार कारवाई केली जाईल. राज्यात अन्न व औषधांच्या नमुन्यांच्या तपासणीसाठी सध्या संभाजीनगर, नागपूर आणि मुंबई येथे तीन प्रयोगशाळा कार्यरत आहेत. याशिवाय रायगड, नाशिक, यवतमाळ आणि पुणे येथे नवीन प्रयोगशाळा सुरू करण्यात येणार असून सार्वजनिक–खासगी भागीदारी तत्त्वावर आणखी २२ प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे अन्ननमुने तपासणीची प्रक्रिया अधिक वेगवान होईल, असे मंत्री झिरवाळ यांनी सांगितले. मंत्री झिरवाळ यांनी सांगितले की, एप्रिल २०२५ ते मे २०२६ या कालावधीत स्टिंग एनर्जी ड्रिंकचे २७ अन्ननमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून त्यापैकी १० नमुने प्रमाणित घोषित करण्यात आले आहेत. तसेच एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत विविध एनर्जी ड्रिंकचे ११५ अन्ननमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. त्यापैकी ६३ नमुने प्रमाणित, एक नमुना कमी दर्जाचा आणि सहा नमुने मिथ्याछाप घोषित करण्यात आले असून उर्वरित नमुन्यांच्या तपासणीची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

# राजमाता जिजामाता



राजमाता जिजाबाई शहाजी भोसले (१२ जानेवारी इ.स. १५९८ – १७ जून , इ.स. १६७४)१ ह्या मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या आई होत्या. त्यांना राजमाता, राष्ट्रमाता, जिजाबाई किंवा जिजाऊ म्हणून संबोधले जाते. सिंदखेडचे लखुजी जाधव हे जिजाबाईंचे वडील व आईचे नाव म्हाळसाबाई होते.२ जाधव हे देवगिरीच्या यादव घराण्याचे वंशज होते. डिसेंबर इ.स. १६०५ मध्ये जिजाबाईंचा शहाजीराजांशी दौलताबाद येथे विवाह झाला. जिजाबाई त्यांच्या सद्गुण, शौर्य आणि दूरदृष्टीसाठी ओळखल्या जात होत्या. त्या एक कुशल घोडेस्वार देखील होत्या. त्या अत्यंत कुशलतेने तलवार चालवू शकत होत्या. भारत सरकारने ७ जुलै १९९९ रोजी जिजाबाईंच्या सन्मानार्थ डाक तिकीट प्रकाशित केले.३४ जिजाबाई या अनेक चित्रपट आणि पुस्तकांच्या प्रेरणा आहेत.

जिजाबाईंचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी महाराष्ट्रातील सध्याच्या बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथे म्हाळसाबाई आणि लखुजी जाधव यांच्या पोटी झाला. लखोजीराजे जाधव हे मराठा कुलीन होते. जिजाबाईंचा विवाह लहान वयातच वेरूळ गावातील मालोजी भोसले यांचा मुलगा शहाजी भोसले यांच्याशी झाला. त्यांनी शिवरायांना स्वराज्याची शिकवण दिली आणि एक महान योद्धा म्हणून उभे केले. १७ जून १६७४ रोजी जिजाबाईंचा मृत्यू झाला. सी.व्ही. वैद्य यांनी त्यांच्या मध्ययुगीन भारत या पुस्तकात असे म्हणले आहे की, यादव निश्चितपणे शुद्ध मराठा क्षत्रिय आहेत. जिजाबाई (शिवाजी महाराजांच्या, ज्यांनी मराठा साम्राज्याची स्थापना केली, त्यांच्या आई) या मराठा/ देवगिरि जाधव/यादव साम्राज्याचे महाराज लखोजीराजे जाधवांच्या पुत्री होत्या.

लखुजीराव जाधव हे निजामशाही दरबारातील बलाढ्य, मातब्बर मंडळी पैकी एक होते. एक दिवशी सर्व सरदार, जहागिरदार, मनसबदार आणि वतनदार शाही कदम पोशी करून आपापल्या घरी जावयास निघाले असता. महाद्वार सामोरी भयंकर गर्दी झाली. या गर्दीत खंडागळ नावाच्या सरदाराचा हत्ती अनियंत्रित झाला. आणि लोकांना पायाखाली तुडवू लागला. अशावेळी लखुजीराव जाधव यांचा मुलगा दत्ताजीने आपल्या सैन्यासह हत्तीला रोखण्यासाठी त्यावर बाणांचा,भाल्यांचा आणि तलवारीचा वार करू लागले. हा सर्व प्रकरण रोखण्यासाठी विठोजी राजे भोसले यांचे दोन्ही मुले संभाजी आणि खेलोजी (शहाजीराजे यांचे चुलतभाऊ) दत्ताजी वर तुटून पडले. आणि भोसले – जाधव यांच्यात युद्ध पेटले. आणि संभाजी ने दत्ताजीला ठार केले. ही बातमी पुढे पोहचलेल्या लखुजीराव जाधव यांना कळताच ते सूड घेण्यासाठी भोसल्यांवर चालून आले.

आणि संभाजी वर प्रहार केला. आपल्या चुलतभावावर वार केला म्हणून शहाजीराजे भोसले देखील या लढाईत उतरले परंतु लखुजीराव जाधवांचा आक्रोश सामोरी त्यांचा टिकाव लागला नाही. लखुजीराव यांच्या तलवारीच्या प्रहाराने शहाजी महाराज गंभीर जखमी झाले. आणि त्यांनी अखेरीस संभाजीला ठार केला. या प्रसंगानंतर जिजाबाईंनी आपल्या पतीशी एकनिष्ठ राहत आपल्या माहेराशी संबंध तोडले.९ नात्यांना, भावनांना बाजूला सारून आपल्या कर्तव्यात कसल्याही प्रकारचा कसूर न होऊ देता धैर्याने आणि खंबीरपणे आल्या प्रसंगाला सामोरे जाण्याचा जिजाबाईंचा हा गुण शिवाजी राजांत पुरेपूर उतरला होता.

**विशेष लेख...**

जिजाबाईंना एकूण सहा (६) अपत्ये होती. त्यापैकी ४ दगावली (मतभेद आहेत) व दोन मुलगे होते. त्यांचा थोरला मुलगा संभाजी हा शहाजी राजांजवळ वाढला तर शिवाजी राजांची संपूर्ण जबाबदारी जिजाबाईंवर होती. जिजाबाईंना पहिले अपत्य झाले त्याचे नाव तो सहा महिन्याचा झाल्यानंतर आपल्या मृत दीराच्या नावाप्रमाणे संभाजी ठेवले. त्यानंतर त्यांना ४ मुले झाली; चारही दगावली. ७ वर्षांचा काळ निघून गेला. १९ फेब्रुवारी १६३०, फाल्गुन वद्य तृतीया, शके १५५१ या दिवशी सूर्यास्ताच्या वेळी शिवनेरी येथे जिजाबाई यांना मुलगा झाला. मुलाचे नाव शिवाजी ठेवले. शिवाजी महाराज १४ वर्षांचे असताना शहाजीराजांनी त्यांच्या हाती पुण्याची जहागीर सुपूर्त केली. अर्थातच जहागीरीची वहिवाट लावण्याची जबाबदारी जिजाबाईंवर येऊन पडली. कुशल अधिकाऱ्यांसमवेत जिजाबाई आणि शिवाजी पुण्यात येऊन दाखल झाले. निजामशाही, आदिलशाही आणि मुघलांच्या सततच्या स्वाऱ्यांमुळे पुण्याची अवस्था अतिशय भीषण होती. अशा प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी जिजाऊ यांच्या सोबत नेटाने पुणे शहराचा पुनर्विकास केला. सोन्याचा नांगर घडवून त्यांनी शेतजमीन नांगरली, स्थानिक लोकांना अभय दिले. शिवाजीच्या राजांच्या शिक्षणाची जबाबदारी पेलली. जिजाबाईंनी शिवरायांना तत्कालीन वारकरी पंथाच्या, परिसरातील वेगवेगळ्या ऐतिहासिक आणि सामाजिक परंपरांचा अभ्यास करविला. वारकरी संतांच्या प्रबोधनाची छाप शिवरायांवर पडली. त्यांचा समतेचा, बंधुभावआणि न्यायाचा उपदेश शिवाजी महाराजांच्या पुढील काळात झालेल्या वाटचालीत आपल्याला दिसून येतो. ज११जिऊ देखिल अत्यंत समता आणि न्यायाच्या पुरस्कर्त्या होत्या. संत तुकाराम महाराज हे तत्कालीन वारकरी संत. तुकोबांच्या विवेकी आणि विद्रोही शिकवणुकीचा आणि जिजाबाईंनी दिलेल्या संस्कारांचा शिवाजी राज्यांवर मोठा प्रभाव राहिला. जिजाबाईंनी नुसत्या गोष्टीच सांगितल्या नाहीत तर सदरेवर शेजारी बसवून राजकारणाचे पहिले धडेही दिले.

शिवरायांच्या मनात कर्तृत्वाची ठिणगी टाकतानाच जिजाबाईंनी त्यांना राजनीतीही शिकविली. समान न्याय देण्याची वृत्ती आणि अन्याय करणाऱ्याला कठोरात कठोर शिक्षा देण्याचे धाडस दिले . शस्त्रास्त्रांच्या प्रशिक्षणावर स्वतः बारकाईने लक्ष ठेवले . शहाजीराजांची कैद व सुटका, अफजलखानाचे संकट, आग्रा येथून सुटका अशा अनेक प्रसंगांत शिवरायांना जिजाबाईंचे मार्गदर्शन लाभले. शिवराय मोठ्या मोहिमांवर असताना, खुद्द जिजाबाई राज्यकारभारावर बारीक लक्ष ठेवत असत. आपल्या जहागिरीत त्या जातीने लक्ष घालत. सदरेवर बसून स्वतः तंटे सोडवत.

१७ जून १६७४ रोजी किल्ले रायगडाजवळील पाचाड गावात त्यांचे निधन झाले. तेव्हा शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला अवघे बारा दिवस झाले होते.१३

जिजाबाई त्यांच्या सद्गुण, शौर्य आणि दूरदृष्टीसाठी ओळखल्या जात होत्या. हे सर्व गुण त्यांनी त्यांचा शिवरायांना दिले. त्या एक कुशल घोडेस्वार देखील होत्या. त्या अत्यंत कुशलतेने तलवार चालवू शकत होत्या. त्यांचा मोठा मुलगा संभाजीचा मृत्यू अफझलखानाने केला होता. त्याचा सूड घेण्यासाठी त्यांनी शिवरायांना प्रोत्साहन दिले, जे त्यांनी पूर्ण केले. पुणे येथील आपल्या पतीची जहागीर त्यांनी समर्थपणे चालवून त्याचा विकास केला. त्यांनी कसबापेठ गणपती मंदिराची स्थापना केली. तसेच केवरेश्वर मंदिर आणि तांबडी जोगेश्वरी मंदिराचा जीर्णोद्धार केला. शहाजी राजे बंगळूरात वास्तव्यास असतांना शिवाजीराजांच्या आई व वडिलांची चोख जबाबदारी जिजाबाईंनी मोठ्या कौशल्याने पार पाडली. सईबाईंच्या पश्चात संभाजी राजांचीही संपूर्ण जबाबदारी त्यांनी उचलली.

शिवरायांच्या पहिल्या पत्नी, सईबाईंचे भाऊ बजाजी निंबाळकर यांचे जुलमाने धर्मपरिवर्तन झाले होते. त्यांची हिंदू धर्मात परत येण्याची इच्छा होती, राजांचाही त्याला पाठिंबा होता. या धर्मराजकारणात जिजाबाई राजांच्या पाठीशी ठाम उभ्या राहिल्या. राजांची कन्या सखुबाईंना, बजाजी निंबाळकरांच्या मुलाला देऊन त्यांनी राज–सोयरीक साधली आणि बजाजींना पूर्णपणे धर्मात परत घेतले. या संपूर्ण प्रकरणात त्यांचा द्रष्टेपणा व सहिष्णुता दिसून येते. राजांच्या सर्व स्वाऱ्यांचा, लढायांचा तपशील त्या ठेवत. त्यांच्या खलबतांत, सल्ला मसलतीत भाग घेत. राजांच्या गैरहजेरीत स्वतः राज्याची धुरा वहात. शिवाजी राजे आग्र्याच्या कैदेत असताना स्वराज्याच्या सीमा वाढवत रांगणा किल्ला जिंकून घेतला. जिजाबाईंनी पूर्णतः जबाबदारी उतारवयातही कौशल्याने निभावून नेली.

राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेबांच्याच प्रेरणेने कानंद, गुंजन, वेळवंड मोसे खोऱ्यातील वीर बाजी पासलकर, झुंजारराव मारळ, तानाजी मालुसरे आदी ६०० तरुण संवगड्यांना सोबत रायरेश्वर पठारावरील रायरेश्वराच्या मंदिरात स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. मोठ्या युक्तीने जिजाऊंच्या मार्गदर्शनामध्ये अत्यंत मुत्सद्देगिरीने बिना लढाई किल्लेदार पळून गेला असे आदिलशाहीला कळवून पहिला किल्ला तोरणा ताब्यात घेतला.पुढे निजामशाहीचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा ह्याच्याशी स्वराज्य उभारणीबाबत चर्चा करून नरसाळा किल्ला मिळविला. चाकणचा किल्लेदार सुद्धा स्वराज्याच्याच विचाराने प्रेरित होऊन स्वराज्यात दाखल झाला. रक्ताचा थेंबही न सांडता तीन किल्ले लोकांच्या उस्फुर्त पाठींब्यातुन मिळाले. लोकांना स्वराज्य पाहिजे आहे हे स्पष्ट झाले, पुढे कोंढाण्याच्या मुसलमान किल्लेदाराला भरपूर पैसे देऊन गड ताब्यात घेतला. शहाजीराजांची परंपरागत जहाँगिरी होती पुणे, सुपे, बारामती, इंदापूर आणि शिरोळ या जहाँगिरीच्या सुरक्षिततेसाठी पुरंदर किल्ला स्वराज्यात असणे किती गरजेचे आहे, हे माँसाहेब जिजाऊंनी पटवून दिले. ऐन दिवाळीच्या दिवशीच पुरंदरचा किल्ला स्वराज्यात आला. व जिजाऊ माँसाहेबांच्या उपस्थितीत शिवरायांनी खरीखुरी दिवाळी साजरी केली. त्यामुळे शहाजीराजे शिवरायांना मदत करीत असल्याचा संशय आला जिंजीच्या मोहिमेवर गेलेल्या शहाजीराजांना वेल्लोर येथे अचानक झडप घालून आदिलशहाने कैद करविले. आदिलशहाने दोन्ही पुत्रांचा बंदोबस्त करण्यासाठी मुर्रादखान व फतेहखान यांना पाठविले. फतेह खानाने अगदी सहज सुभानमंगल किल्ला जिंकला म्हणून मोठ्या आनंदाने विजयोत्सव साजरा करून झोपले अश्या वेळी मल्हार कावजीच्या नेतृत्वात मावळ्यांनी अर्ध्या तासात फौज कापून काढली.उरलेले खानाचे सैन्य पळु लागले जे जीवंत सापडले ते शरण आले व स्वराज्यात मावळे म्हणून दाखल झाले. खानाचा खजिना, नव्या दमाचे ५०० घोडे मिळाले व हीच रसद पुढे खानाच्या पराभवासाठी वापरली. महाराजांनी खानाच्या बोलसद, शिरवळ छावणीवर हल्ले करून खानाला डिवचले. खानाने पुरंदरवर चाल केली, खानाचे सैन्य पुरंदरवर अर्ध्यापर्यंत चढल्यावर अचानक दरवाजा उघडून खानाच्या सैन्यावर हल्ला चढविला आणि खानाचे सैन्य कापून काढले. खानाचा सासवडपर्यंत पाठलाग केला, तिकडे संभाजी राजांनी सुद्धा हिंदू राजांना एकत्रित करून फर्राबखानाची धुळधाण उडविली, अश्याप्रकारे आदिलशहाला जिजाऊ माँसाहेबांच्या दोन्ही पुत्रांनी तडाखेबंद उत्तर दिले. जिजाऊंच्या सल्ल्यानुसार शिवाजी महाराजांनी मोगलांचा दक्षिणेतील सुभेदार मुराद बक्ष यांच्याशी संधान साधले व आदिलशाहीला मोगलांकडून फर्मान आले शहाजीराजे भोसले आमचा माणूस आहे, शिवाजी भोसले आमच्या सेवेत आहे, त्याचे वडील शहाजीराजे यांना तातडीने मुक्त करावे त्यामुळे शहाजीराजेंची सन्मानपूर्वक सुटका करण्यात आली, आदिलशहाला मोठी चूक झाल्याचे कळून चुकले आणि त्याने शहाजीराजेंना दरबारात बढती देऊन फर्जंद पदावर घेतले, या संपूर्ण प्रकरणामागे माँसाहेब जिजाऊंची मुत्सद्दीगिरी कारणीभूत ठरली. २५ जुलै १६२९ला निजामाने विश्वासघाताने भर दरबारात वडील राजे लखुजीराव, भाऊ अचलोजी व राघोजी आणि भाचा यशवंतराव या चौघा कुटुंबियांना एकाच वेळी खून केला. तेव्हापासून जिजाऊ माँसाहेबांनी स्वराज्य निर्मितीचा ध्यास घेऊन अखंड सावधानता बाळगली. निजामाच्या दरबाराची पुन्हा पुनरावृत्ती होऊ नये म्हणून एकाच वेळी चार ठिकाणी स्वराज्याचे चारधाम चार शक्तिस्थळे निर्माण केली.

## धुळे महापालिकेला व्यापारी संकुलांमधून सुमारे अडीच कोटींचे उत्पन्न

धुळे – धुळे महानगरपालिकेच्या मालकीच्या इजडढ तत्त्वावर उभारण्यात आलेल्या पारोळा रोडवरील आर. आर. पाटील व्यापारी संकुल आणि मालेगाव रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल येथील गाळ्यांच्या भाडेकरारानुसार धुळे महानगरपालिकेला अंदाजे २ कोटी ५० लाख रुपयांचे उत्पन्न मिळणार आहे. या दोन्ही व्यापारी संकुलांतील गाळ्यांच्या भाडेनिश्चितीबाबत सन २०१७ पासून विकासक, संबंधित विभागाचे अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांच्या वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या होत्या. मात्र भाड्याचा दर, आकारणीची तारीख तसेच करारातील अटी–शर्ती याबाबत अंतिम निर्णय न झाल्याने सन २०१६ पासून भाडे आकारणीची प्रक्रिया प्रलंबित होती.

महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आयुक्त श्री. नितीन कापडणीस यांनी बाजार विभाग आणि बांधकाम विभागाची संयुक्त बैठक घेऊन विकासक मे. बोरसे ब्रदर्स इंजिनीअर ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स प्रा. लि., धुळे तसेच द्विसदस्यीय व त्रिसदस्यीय करार असलेल्या भाडेपट्टाधारकांच्या नावाने दि. १५ मार्च २०१७ ते सन २०२६–२७ या कालावधीतील देयकांची आकारणी करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार बांधकाम विभागाने उपलब्ध करून दिलेल्या क्षेत्रफळाच्या आधारे आकारणीची कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून गाळेधारकांना देयके वितरित करण्याचे काम सुरू आहे. पारोळा रोडवरील आर. आर. पाटील व्यापारी संकुलातील ८४ गाळ्यांमधून अंदाजे दीड कोटी रुपये, तर मालेगाव रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुलातील ९५ गाळ्यांमधून अंदाजे १ कोटी रुपये असे एकूण सुमारे २.५० कोटी रुपयांचे उत्पन्न धुळे महानगरपालिकेला प्राप्त होणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६

## बळीराजाच्या आर्थिक पुनरुत्थानासाठी राज्य शासनाचे ऐतिहासिक पाऊल

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही कृषी क्षेत्रावर आधारित आहे. राज्यातील लाखो शेतकरी शेती आणि शेतीपूरक व्यवसायांवर आपली उपजीविका अवलंबून ठेवतात. मात्र, गेल्या काही वर्षांत अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील चढ-उतार आणि नैसर्गिक आपत्ती यासारख्या परिस्थितीचा सर्वाधिक परिणाम शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर झाला असून अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' जाहीर करून शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे.

कर्जमुक्तीची आवश्यकता - शेती हा निसर्गावर अवलंबून असलेला व्यवसाय आहे. पावसाचे अनिश्चित स्वरूप, हवामान बदलाचे परिणाम, उत्पादन खर्चातील वाढ आणि शेतीमालाला हमीभाव न मिळाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना घेतलेले पीक कर्ज वेळेवर फेडणे शक्य झाले नाही. परिणामी त्यांच्यावर थकबाकी वाढत गेली आणि नव्याने कर्ज मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि त्यांना पुन्हा बँकिंग व्यवस्थेशी जोडण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण ठरत आहे.

योजनेची उद्दिष्टे - पात्र शेतकऱ्यांना कर्जाच्या ओझ्यातून मुक्त करणे. शेतकऱ्यांची पत पुनर्स्थापित करून नव्याने पीक कर्ज उपलब्ध करून देणे. कृषी उत्पादनात सातत्य राखणे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणे. नियमित कर्जफेडीला प्रोत्साहन देणे. डिजिटल व पारदर्शक पद्धतीने लाभ वितरित करणे.

योजनेची ठळक वैशिष्ट्ये - या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांच्या दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदत पीक कर्जाची माफी करण्यात येणार आहे. शासनाने निश्चित केलेल्या कालावधीत घेतलेल्या व पात्र ठरणाऱ्या पीक कर्जांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.याशिवाय, नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांसाठी ५० हजार प्रोत्साहनपर लाभाची तरतूद करण्यात आली आहे. दीर्घकाळ थकीत असलेल्या काही प्रकरणांमध्ये एकरकमी तडजोडीची (OTS) सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. ग्रीस्टॅकद्वारे पारदर्शक अंमलबजावणी - योजनेची अंमलबजावणी अधिक परिणामकारक आणि पारदर्शक करण्यासाठी ग्रीस्टॅक प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. शेतकऱ्यांची जमीन, पीक, बँक खाते, आधार क्रमांक आणि कर्जाची माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध होत असल्याने पात्र लाभार्थी निश्चित करणे सुलभ झाले आहे.ही प्रणाली भविष्यातील विविध कृषी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठीही महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

बँका आणि सहकारी संस्थांची जबाबदारी - या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राष्ट्रीयीकृत बँका, ग्रामीण बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. लाभार्थ्यांची माहिती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करणे, कर्ज खात्यांची पडताळणी करणे, शेतकऱ्यांना आवश्यक माहिती देणे आणि शासनाच्या सूचनांनुसार कार्यवाही करणे ही जबाबदारी संबंधित संस्थांवर आहे.

बँकेनी व्याजाची आकारणी करू नये - राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत पात्र लाभार्थ्यांच्या थकीत कर्ज रकमेवर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि विविध कार्यकारी सहकारी संस्था (विकास संस्था) यांनी १ एप्रिल २०२६ ते प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंतच्या कालावधीत व्याज आकारणी करण्यात येणार नाही.

शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी - योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी आधार क्रमांक बँक खात्याशी जोडलेला असल्याची खात्री करावी. ग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करावी. बँकेत उपलब्ध कर्जाची माहिती पडताळून घ्यावी.आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करावीत. शासनाकडून प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना - शेतकऱ्यांचे कर्ज कमी झाल्यामुळे त्यांची क्रयशक्ती वाढते. त्याचा सकारात्मक परिणाम कृषी निविष्ठांच्या विक्रीवर, ग्रामीण उद्योगांवर, बाजारपेठांवर आणि रोजगारनिर्मितीवर होतो. त्यामुळे ही योजना केवळ शेतकऱ्यांसाठीच नव्हे तर ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठीही महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

समृद्ध शेतीकडे वाटचाल - कर्जमुक्तीबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, जलसंधारण, पीक विविधीकरण, कृषी प्रक्रिया उद्योग, शेतकरी उत्पादक कंपन्या (ऋझज), सेंद्रिय शेती आणि मूल्यवर्धन यांसारख्या उपक्रमांचा स्वीकार केल्यास शेतकरी अधिक सक्षम होतील. शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेतल्यास उत्पन्नवाढीस मोठी मदत होऊ शकते. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' ही महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राला नवी दिशा देणारी योजना आहे. कर्जमुक्तीमुळे शेतकऱ्यांचा आर्थिक ताण कमी होईल, नव्याने पीक कर्ज उपलब्ध होईल आणि कृषी क्षेत्राला नवसंजीवनी मिळेल. आर्थिकदृष्ट्या सक्षम, तंत्रज्ञानाभिमुख आणि आत्मनिर्भर शेतकरी घडविण्याच्या दिशेने ही योजना महत्त्वपूर्ण ठरेल. बळीराजाचा विकास म्हणजेच राज्याचा विकास या विश्वासातून राबविण्यात येणारी ही योजना ग्रामीण महाराष्ट्राच्या प्रगतीचा नवा अध्याय लिहिणारी ठरेल.

संकलन - जिल्हा माहिती कार्यालय,धुळे

---

(पान १ वरून) **आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर...**

उपचार केंद्रे व तातडीच्या वैद्यकीय सेवांची माहिती सहज उपलब्ध होणार असून, आपत्कालीन परिस्थितीत त्वरित आरोग्य सेवा मिळण्यास मदत होणार आहे.

बैठकीच्या सुरुवातीला आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक संजय काटकर यांनी विभागामार्फत वारीसाठी करण्यात आलेल्या उपाय योजना तसेच नियोजनाविषयी माहिती दिली. तत्पूर्वी, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांनी औंध येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाला भेट देऊन तेथील आरोग्य सेवांचा आढावा घेतला आणि रुग्णांशी संवाद साधून आस्थेने विचारपूस केली. त्यानंतर पालखी मार्गावरील वारकऱ्यांच्या मुक्काम स्थळी भेट देऊन आरोग्य सेवांची पाहणी केली. त्याचप्रमाणे मुक्काम स्थळावरील पिण्याच्या पाण्याची सुविधा, विहिरी तसेच रेस्टॉरंट यांचीही पाहणी केली. पालखी मार्गावरील आरोग्य केंद्र तसेच पंढरपूर येथील उपजिल्हा रुग्णालयाला भेट देऊन तेथील आरोग्य सेवांचा आढावा घेतला.

वारकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या प्रमुख आरोग्य सुविधा- पालखी मार्गावरील पाणी स्रोतांचे सर्वेक्षण व निर्जंतुकीकरण. डेंग्यू, मलेरिया आदी कीटकजन्य आजारांचे सर्वेक्षण तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजना. पालखी मार्गावरील हॉटेल, ढाबे व उपहारगृहांतील कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी व उपचार. वारीनंतर ग्रामपंचायतींच्या माध्यमातून विशेष स्वच्छता अभियान. असंसर्गजन्य आजारांची तपासणी, समुपदेशन व उपचार सुविधा.

पालखी मार्गावरील खासगी रुग्णालयांमध्ये अत्यावश्यक सेवांसाठी १० टक्के खाटा राखीव. पालखी मार्गावर ४३ ठिकाणी सुसज्ज आयसीयू सुविधा. पालखी मार्गावर १५६ ठिकाणी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' मार्फत प्राथमिक उपचार केंद्रे. वारकऱ्यांच्या सेवेसाठी २१५ आरोग्यदूतांची नियुक्ती. पंढरपूर उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण भागात १६ आयसीयू कक्ष आणि १७ तात्पुरते ' आपला दवाखाना' सुरू. विठ्ठल मंदिर परिसरात २७X७ सुसज्ज आयसीयू कक्ष कार्यरत. पंढरपूर व माळशिरस ग्रामीण भागात अतिरिक्त ५ आयसीयू कक्ष. पालखी मार्गावर ३५३३ रुग्णवाहिका (३८ -ड्ड, ७३ इड्ड आणि '१०२' क्रमांकाच्या २४२ रुग्णवाहिका) तैनात.

गंभीर रुग्णांसाठी एअर म्ब्युलन्स सुविधा उपलब्ध. प्रत्येक दिंडी प्रमुखास प्राथमिक उपचार औषध संचाचे वितरण. सेवेसाठी ३,०८७ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तसेच ३०२ तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती. पंढरपुरात तीन दिवस २४७ महाआरोग्य शिबिर, सर्व तज्ज्ञ सेवा व ५ खाटांचे आयसीयू. पालखी मार्गावरील सर्व आरोग्य सुविधा, रुग्णवाहिका व उपचार केंद्रांचे डिजिटल मॅपिंग. 'आरोग्यसंपन्न वारी' मोबाईल पद्वारे तात्काळ आरोग्य सुविधांची माहिती. महाआरोग्य शिबिरात वारकऱ्यांना मोफत चष्म्यांचे वाटप. आरोग्यविषयक जनजागृतीसाठी पोस्टर्स, फलक, पत्रके, माहिती रथ तसेच टोपी, टी-शर्ट यावर आरोग्य संदेशांचे वितरण करण्यात येतील. असे जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

---

# धुळे जिल्ह्यात सर्वंकष प्राथमिक आरोग्य सेवा प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ






धुळे (जिमाका) - महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णयानुसार आयुष्मान आरोग्य मंदिर-उपकेंद्रांमधील समुदाय आरोग्य अधिकारी (उक्ज), -छ्च्, चझथ व आशा स्वयंसेविकांसाठी सर्वंकष प्राथमिक आरोग्य सेवा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत असून, या उपक्रमाचा जिल्हास्तरीय शुभारंभ प्राथमिक आरोग्य केंद्र, कुसुंबा येथे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद धुळे डॉ. सचिन बोडके यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ.विशाल पाटील प्रशिक्षण केंद्र वैद्यकीय अधिकारी,डॉ संजय मोरे सहहायक जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ सूर्यवंशी वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र कुसुंबा, श्रीमती जोशी जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र नाशिक व जिल्हा स्तरीय मास्टर ट्रेनर उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना मा. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सांगितले की, बदलत्या आरोग्य गरजा लक्षात घेऊन प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण व लोकाभिमुख करण्यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. या प्रशिक्षणाद्वारे मातृ व बाल आरोग्य, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे व्यवस्थापन, मानसिक आरोग्य, वृद्धांची आरोग्य सेवा, आपत्कालीन सेवा, कुटुंब नियोजन तसेच आरोग्य प्रबोधन या विषयांवर आरोग्य कर्मचाऱ्यांचे ज्ञान व कौशल्य अधिक बळकट होणार आहे.

डॉ. विशाल पाटील प्रशिक्षण केंद्र वैद्यकीय अधिकारी यांनी प्रशिक्षणामध्ये विविध तांत्रिक विषयांवर सत्रे, गटचर्चा, प्रात्यक्षिके ,आणि प्रश्नोत्तरे माध्यमातून सहभागी प्रशिक्षणार्थींचे ज्ञान व कौशल्य ,वृधिंगत करण्यात येईल असे सांगितले. शासनाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील ४१ प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार असून, जिल्ह्यातील सर्व आयुष्मान आरोग्य मंदिर-उपकेंद्रांतील चज, उक्ज, -छ्च्, चझथ व आशा स्वयंसेविका यांना या प्रशिक्षणाचा लाभ दिला जाणार आहे. या प्रशिक्षणामुळे गावपातळीवर अधिकाधिक आरोग्य सेवा उपलब्ध होऊन Resolve More, Refer Less या संकल्पनेला बळ मिळणार आहे. या कार्यक्रमास आरोग्य विभागाचे अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, प्रशिक्षणार्थी उक्ज, -छ्च्, चझथ तसेच आशा स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हा प्रशिक्षण कार्यक्रम टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. असे जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# सुलवाडे–जामफळ–कनोली उपसा सिंचन योजनेची जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केली पाहणी







धुळे (जिमाका) – धुळे जिल्ह्यातील महत्त्वाकांक्षी सुलवाडे– जामफळ– कनोली उपसा सिंचन योजनेची जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी आज प्रत्यक्ष पाहणी करून प्रकल्पाच्या कामांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रकल्पातील विविध कामांची प्रगती, कालव्यांची उभारणी, पंपगृहाची स्थिती, बंदिस्त नलिका पाईपलाईन तसेच प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेतला. संबंधित अधिकाऱ्यांनी कामांच्या सद्यस्थितीबाबत माहिती दिली. जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी कामांची गुणवत्ता राखून प्रलंबित कामे नियोजित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला दिल्या. तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीत कोणत्याही प्रकारचा विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले.

सुलवाडे–जामफळ–कनोली उपसा सिंचन योजना पूर्ण झाल्यानंतर धुळे जिल्ह्यातील मोठ्या क्षेत्राला सिंचनाची सुविधा उपलब्ध होणार असून शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनात वाढ होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रकल्पाची कामे गतीने आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यावर भर देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिल्या. पाहणीदरम्यान सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन कार्यकारी अभियंता संदीप पवार,लघुपाटबंधारे विभाग धुळे,कार्यकारी अभियंता स्वप्निल गांगुर्डे , तहसीलदार शिंदखेडा नितीन कुमार देवरे, सहाय्यक कार्यकारी अभियंता विक्रम पवार, सहाय्यक अभियंता विशाल खैरनार,संबंधित विभागाचे अधिकारी, अभियंते तसेच प्रकल्पाशी संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी गुलाबी ई-रिक्षा योजनेला गती; पहिल्या टप्प्यात ५ हजार महिलांना लाभ देण्याचे उद्दिष्ट–मंत्री आदिती तटकरे

मुंबई – राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या गुलाबी (पिंक) ई–रिक्षा योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून, चालू आर्थिक वर्षात किमान ५ हजार महिलांना या योजनेचा लाभ देण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी विधानपरिषदेत दिली. राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी गुलाबी ई–रिक्षा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबतचा प्रश्न विधानपरिषद सदस्य चित्रा वाघ यांनी मांडला. या चर्चेत सदस्य अभिजित वंजारी, परिणय फुके यांनी सहभाग घेतला. या प्रश्नांना उत्तर देताना त्या बोलत होत्या.

मंत्री तटकरे म्हणाल्या की, पहिल्या टप्प्यातील उद्दिष्ट पूर्ण झाल्यानंतर नगरपरिषदांसह राज्यातील इतर शहरांमध्येही ही योजना विस्तारण्याचा शासनाचा मानस आहे. २०२४ मध्ये प्रायोगिक तत्त्वावर पुणे, नाशिक, नागपूर, अहिल्यानगर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर आणि सोलापूर या आठ जिल्ह्यांतील प्रमुख शहरांमध्ये गुलाबी ई–रिक्षा ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याबरोबरच महिला प्रवाशांना सुरक्षित प्रवासाचा पर्याय उपलब्ध करून देणे हा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे ई–रिक्षा चालविणारी व्यक्ती महिला असणे ही अट ठेवण्यात आली आहे. मात्र अनेक अर्जदारांनी रिक्षा स्वतः चालविण्याऐवजी दुसऱ्याला चालविण्यास देण्याची अपेक्षा व्यक्त केल्याने अनेकांनी अर्ज मागे घेतल्याचे मंत्री तटकरे यांनी सांगितले.

त्यांनी सांगितले की, आतापर्यंत १३० गुलाबी ई–रिक्षांचे वितरण करण्यात आले असून त्या यशस्वीपणे सुरू आहेत. या योजनेत ई–रिक्षाच्या खर्चापैकी २० टक्के अनुदान शासनाकडून, ७० टक्के बँक कर्जाद्वारे आणि १० टक्के लाभार्थीचा सहभाग ठेवण्यात आला आहे. लाभार्थ्यांचा आर्थिक सहभाग असल्यास योजनेबाबत जबाबदारी आणि सातत्य राहते. ई–रिक्षा चालक महिलांसाठी प्रशिक्षण, चार्जिंग स्टेशनची सुविधा आणि इतर आवश्यक बाबींची जबाबदारी पुरवठादार कंपनीवर सोपविण्यात आली आहे.

## ईएसआय रुग्णालयांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानावर भर; आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्यासाठी शासनाचे प्रयत्न–मंत्री प्रकाश आबिटकर

मुंबई – राज्यातील कामगार विमा रुग्णालयांमध्ये (ईएसआय) आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून आरोग्यसेवा सक्षम, जलद आणि सुलभ करण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. सदस्या मनीषा कायंदे यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य भाई जगताप, प्रसाद लाड, राजीव पोतदार यांनी उपप्रश्न उपस्थित केला होता. त्यास उत्तर देताना ते बोलत होते. मंत्री आबिटकर म्हणाले की, ईएसआय रुग्णालयांमध्ये आधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून कामगारांना त्यांच्या परिसरातच दर्जेदार उपचार मिळावेत, यासाठी शासन कटिबद्ध आहे. एक्स–रे मशीनसह आवश्यक वैद्यकीय सुविधा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिल्या जात आहेत. ईएसआय रुग्णालयांमध्ये रेडिओलॉजिस्टची कमतरता असली तरी रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून उपलब्ध एमबीबीएस डॉक्टरांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यांच्या माध्यमातून सेवा सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. ५० पेक्षा अधिक रुग्णसंख्या असलेल्या ईएसआय रुग्णालयांमध्ये सीटी स्कॅन व एमआरआयसारख्या सुविधा उपलब्ध करून रुग्णांना शहरात जाण्याची गरज भासणार नाही.

ईएसआय रुग्णालयांतील उपलब्ध पायाभूत सुविधांचा प्रभावी वापर करून कामगारांना अधिकाधिक सुविधा मिळाव्यात, यासाठी सर्व लोकप्रतिनिधींच्या सहभागातून बैठक घेऊन सुधारणा करण्यात येतील. तसेच ईएसआय योजनेअंतर्गत मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध आहे. या योजनेबाबत व्यापक जनजागृती करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. वैद्यकीय उपकरणांच्या खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता आणि गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असे सांगताना मंत्री आबिटकर यांनी केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक असल्यास सार्वजनिक क्षेत्रातील (पीएसयू) संस्थांचाही समावेश करण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल.

हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय – घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे – ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर – भ्रमणध्वनी – ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार – ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखाणाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)